// सा विद्या या विमुक्तये //

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड—४३१ ६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded – 431606 (Maharashtra)

Establishment on 17th September 1994 -Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

## ACADEMIC (AFFILIATION) SECTION

Phon:(02462)229242/43
Fax : (02462) 229245 / 229325

Website : srtmun.ac.in
e-mail :affi.srtmun@gmail.com

जा.क्र शैक्षणिक/संलग्न—०३/लातूर—३०३/२०१८—२०१९/3753 दिनांक : १५.०५.२०१९

प्रति,
मा. प्राचार्य,
दयानंद विज्ञान महाविद्यालय,
लातूर, ता. जि. लातूर—४१३५१२.

Dayanand Science College
File No. 05/58
Ref No. 23
Date: 16/5/19
LATUR Dist. Latur

विषय :— "रसायनशास्त्र (Chemistry) ", या विषयाच्या संशोधन केंद्रास मान्यता प्रदान करणे बाबत.

संदर्भ :—१. आपण दि. २९.०९.२०१८ रोजी विद्यापीठास सादर केलेला प्रस्ताव.
२. या विभागाचे पत्र क्र.शैक्षणिक/संलग्न—०३/लातूर—३०३/२०१८—२०१९/३३७८, दि. २९.०३.२०१९.
३. मा. विद्या परिषद बैठक ऐनवेळचा विषय क्र. २६/४३—२०१९, दि. ३०.०४.२०१९.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय क्र. ०१ नुसार आपल्या महाविद्यालयात " रसायनशास्त्र (Chemistry)", या विषयाचे संशोधन केंद्र सुरु करणेबाबत विद्यापीठात प्रस्ताव दाखल केला होता.

या संदर्भात विद्यापीठाने संदर्भांकित पत्र क्र. ०२ नुसार डॉ.पुदुकुलथान झुबेदा कदात यांचे अध्यक्षतेखाली डॉ. ओमप्रकाश श्रीनिवास येमुल व डॉ.विजय नागोराव भोसले हे सदस्य असलेली त्रिसदस्यीय पाहणी समिती पाठविलेली होती. पाहणी समितीने पाहणी करुन आपल्या महाविद्यालयात "रसायनशास्त्र (Chemistry) ", या विषयाच्या संशोधन केंद्रास मान्यता प्रदान करणेबाबत सकारात्मक शिफारस केली होती. सदर शिफारस संदर्भिय क्र. ०३ नुसार दि. ३०.०४.२०१९ रोजी संपन्न झालेल्या मा. विद्या परिषद बैठकीत ऐनवेळचा विषय क्र. २६/४३—२०१९ अन्वये मा. विद्या परिषदेच्या बैठकीत निर्णयार्थ ठेवण्यात आली होती व मा. विद्या परिषदेने यास मान्यता प्रदान केली आहे.

याबाबत आपणास कळविण्यात येते की, मा. विद्या परिषदेने, पाहणी समितीने घेतलेल्या निर्णयास मान्यता दिलेली असल्यामुळे आपल्या महाविद्यालयातील "रसायनशास्त्र (Chemistry) ", या विषयाच्या संशोधन केंद्रास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार कलम १११ मधील तरतुदीप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१९—२० या शैक्षणिक वर्षापासून मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

Scanned with CamScanner

तथापि, या संदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, विद्यापीठ अनुदान आयोग व प्रस्तुत विद्यापीठाचे परिनियम (Statute), आदेश (Ordinance) तसेच महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नियमांचे पालन करणे महाविद्यालयास बंधनकारक राहील. कळावे.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव,
शैक्षणिक (संलग्निकरण) विभाग

प्रत :-

१. मा. अध्यक्ष/सचिव, दयानंद एज्युकेशन सोसायटी, लातूर, ता. जि. लातूर द्वारा :- दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर, ता. जि. लातूर ४१३५१२.
२. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ.
३. मा. उपकुलसचिव, परीक्षा (पात्रता) व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ.
४. मा. उपकुलसचिव, पदव्युत्तर विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.



Scanned with CamScanner